# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प.) ता.जि.ठाणे – ४०१ १०१


जा.क्र.मनपा/लेखा/९८८ /२०१७-१८

दि.३१/०३/२०१८.

## // कार्यालयीन आदेश //

०८
२/४/२०१८

आपणांस या आदेशाद्वारे कळविण्यांत येत आहे की, सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाचे अंदाजपत्रकातील लेखाशिर्षनिहाय करण्यांत आलेल्या तरतुदी पाहता विभाग प्रमुख म्हणून आपण आपल्या विभागाचे स्वतंत्र Budget Control Register ठेवून त्यामध्ये मागील वर्षाचा Spill Over ठेकेदार व कामांचे नांवासह प्राधान्याने नोंद करून उर्वरित तरतुदीमधूनच चालू वर्षातील कामे प्रस्तावित करावयाची आहेत. आपलेकडील नोंदीनुसार लेखा विभागाने Budget Control Register विभाग प्रमुखांची स्वाक्षरी असल्याखेरीज नोंदी करु नयेत अथवा प्रस्ताव पुढे पाठवू नयेत याची दक्षता घ्यावी. विभागांचे Budget Control Register मध्ये खाडाखोडी निदर्शणांस आल्यास त्यांचे प्रस्ताव स्विकारु नयेत. हया खाडाखोडीस विभाग प्रमुख व्यक्तिशः जबाबदार राहतील याची स्पष्ट नोंद घ्यावी.

तसेच लेखा विभागाकडे Bill Control Register ठेवण्यांत येत आहे. त्यामध्ये लेखाशिर्षनिहाय नोंदी घेवून त्याच लेखाशिर्षाखालील मंजूरी देयकास प्राप्त असल्याची खात्री करूनच नोंदी घेण्यांत याव्यात. Bill Control Register मध्ये प्रथमतः Outstanding Bill यांची नोंद त्या त्या लेखाशिर्षाखाली प्रथमतः घेण्यांत यावी. त्यानंतरच चालू वर्षातील देयकांच्या नोंदी घ्याव्यात. यामध्ये विभाग प्रमुख व लेखा विभाग यांनी दक्षता घ्यावी. आदेश प्राप्त होताच पुढील योग्य ती अमंलबजावणी करावी.

बी.जी.पवार (भा.प्र.से)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रति,
श्री/श्रीम. ____________

प्रत माहितीसाठी
१) अति. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका
२) मुख्यलेखापरिक्षक, मिरा-भाईंदर महानगरपालिका
३) सर्व उपायुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका
४) शहर अभियंता, मिरा-भाईंदर महानगरपालिका
५) मुख्यलेखाधिकारी, मिरा-भाईंदर महानगरपालिका
६) सर्व कार्यकारी अभियंता, मिरा-भाईंदर महानगरपालिका